

सोनमचे

# लडाख!

मनीष लखानी

कथाचे ३००एम थिंकबुक



मी आहे सोनम

मी लडाखमध्ये राहते

सोनम तिचा मित्र मनीष लखानी
आणि तिच्या पाळीव कुत्र्यासह.



मी पाचव्या इयत्तेत शिकते.
मी माझ्या कुटुंबाच्या पश्मिना
कळपाचीही काळजी घेते.



मी चांगपा जमातीतील आहे

आम्ही भटके मेंढपाळ आहोत



हिवाळ्यात लडाखमध्ये सर्व
काही गोठते. मोठे धबधबेसुद्धा!



पण उन्हाळ्याच्या महिन्यांमध्ये लडाख
उबदार असतं आणि रंगीबेरंगी सुद्धा!



हा लडाखमधला माझा सर्वात आवडता
तलाव आहे. त्सो कार तलाव.



मला खेळायला आवडतं! आणि
सायकल माझी बेस्ट फ्रेंड आहे.



पण पेमा या माझ्या छोट्या मैत्रिणीला तिच्या
पाळीव बकरीसोबत खेळायला आवडतं.



माझी आजी नेहमी म्हणते की, मेंढ्या आणि बकऱ्या आणि कुत्रे हे पैशाच्या खोक्यांपेक्षा चांगले असतात!



याकच्या लोकरीपासून तयार
केलेल्या तंबूमध्ये आम्ही राहतो.
हे आमचे स्वयंपाकघर आहे.

याक आमचे मित्र आहेत.ते आम्हाला
शेती पिकवायला मदत करतात.





लडाखमध्ये इतर
प्राणीसुद्धा आहेत.




रुबाबदार घोडे



दुर्मीळ युरेशियन
ऑटर



आणि शंकू हा
हिमालयातील लांडगा



लडाखमध्ये अनेक मठ
आहेत. हा थिक्सी मठ आहे.
हा सिंधुच्या खोऱ्यात आहे.



पण सगळ्यात भारी म्हणजे - आमच्याकडच्या रात्री एकदम शांत असतात आणि भरपूर तारे दिसतात!



# हिमालयाचे हृदय!


तुमच्या शहरातून लडाखपर्यंतचा रस्ता पाहा.

## चांगपा

चांगपा ही निम-भटकी जमात आहे. ते हिमालयातील चांगथांग या तिबेटपासून लडाखपर्यंत पसरलेल्या जगातील सर्वात थंड वाळवंट असलेल्या विशाल तिबेटी पठारावर राहतात.

चांगपा हे एका गवताळ प्रदेशातून दुसऱ्या गवताळ प्रदेशात प्रवास करतात आणि मांस व लोकरीचा व्यापार करतात.

चांगपा हे पश्मिना आणि याकच्या लोकरीपासून सुंदर वस्तू तयार करतात.



चांगपा बार्ली, गहू आणि मटारची शेती करतात.

## लडाखमधील वितळणाऱ्या हिमनद्या

लडाखमध्ये खूप हिमनद्या आहेत. आपल्या सर्वांसाठीच त्या खूप महत्त्वाच्या आहेत. पण वाढते प्रदूषण आणि वृक्षतोड यामुळे पृथ्वीवरील तापमान वाढत आहे आणि लडाखमधील हिमनद्या वितळत आहेत

### विचार करा

लडाखमधील हिमनद्यांचे वितळणे थांबविण्यासाठी आपण प्रदूषण कसे कमी करू शकतो?

### विचारा

आपल्या पर्यावरणाची काळजी घेण्यासाठी आपण काय करू शकतो?

### चर्चा करा

तुमच्या मित्रांसोबत, प्रदूषण कमी करण्यासाठी ६ महिन्यांची योजना तयार करा

### कृती करा

तुमचा खारीचा वाटा उचला. छोटी पावलं उचलून सुरुवात करा.

- शक्य तेवढे अंतर चालत जा किंवा सायकलचा वापर करा
- विजेचा वापर कमी करा
- कचऱ्याचे रिसायकलिंग करा
- कापडी पिशव्या वापरा. प्लास्टिकचा वापर टाळा.
- वृक्षारोपण करा
- स्थानिक पातळीवर पिकविलेले अन्नपदार्थ विकत घ्या आणि खा.




या, लडाखला येऊन मला भेटा!

मनीष लखानी : फोटोग्राफर आणि साहसी सफरींचा छंद असलेल्या मनीष लखानी यांना त्यांचा कॅमेरा, सायकल आणि डोंगर खूप आवडतात. डोंगरांवरील त्यांच्या प्रेमामुळे त्यांनी अनेकदा लडाखची सफर केली आहे.

# KATHA

कथा ही जागतिक पातळीवरील मान्यताप्राप्त स्वयंसेवी संस्था (www.katha.org) आहे. ही संस्था १९८८ सालापासून साक्षरतेपासून ते साहित्यापर्यंत विविध क्षेत्रांत अविरतपणे काम करत आहे. प्रकाशन आणि गरीब मुलांच्या शिक्षणासाठी काम करण्याचा आमचा सुमारे ३० वर्षांचा अनुभव आहे.

"भारताच्या शिरपेचातील शैक्षणिक हिरा." - **नाओयुकी शिनोहारा, व्यवस्थापकीय उपसंचालक, आयएमएफ**

"कथा हा जगभरातील कल्पक प्रकल्पांसाठी एक आदर्श उदाहरण आहे, जो शहरातील सामान्य व नाट्यमय व्यथांना टिपतो."
- **चार्ल्स लँड्री, द आर्ट ऑफ सिटी मेकिंग**

"कथाला मुलांबद्दल ममत्व आहे. म्हणूनच ही संस्था मुलांसाठी इतकी सुंदर पिक्चर बुक्स म्हणजेच चित्रपुस्तके तयार करते"
- **टाइम आउट**

"मुले ही कथाच्या पुस्तकांमध्ये जसा बदल घडवतात तसा त्यांच्या समुदायामध्ये शाश्वत आणि प्रत्यक्ष बदल घडवू शकतात, या संकल्पनेवर कथाचे काम आधारलेले आहे" - **पेपरटायगर्स**


प्रथम आवृत्ती वर्ष २०२१


कॉपीराइट © कथा, २०१७, २०२१
मजकूर कॉपीराइट © मनीष लखानी
फोटोग्राफी कॉपीराइट © मनीष लखानी


ए३, सर्वोदय एन्क्लेव्ह, श्री अरबिंदो मार्ग, नवी दिल्ली ११००१७
फोन: ९१-११ ४१४१ ६६००. ४१४१ ६६१०
ई-मेल: editors@katha.org, Website: www.katha.org
ISBN 978-93-82454-65-6


**आमचे मिशन :** प्रत्येक मूल उत्तम वाचेल आणि मजेसाठी वाचेल!
कथा ही नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था असून ही संस्था १९८८ साली सुरू झाली. आम्ही साक्षरतेपासून ते साहित्यापर्यंतच्या क्षेत्रात अविरत काम करत आहोत. मुलांमध्ये आणि प्रौढांमध्ये वाचनाची आवड वृद्धिंगत व्हावी यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, आम्ही गरीबीत जगत असलेल्या १,००,००० मुलांसोबत काम करत असून दर्जेदार पुस्तके आणि इतर प्रयत्नांच्या माध्यमातून त्यांना श्रेणी पातळीवर आणण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत.


सर्व हक्क आरक्षित. प्रकाशकाच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय या पुस्तकातील कोणताही भाग पुनरुत्पादित केला जाऊ नये किंवा कोणत्याही प्रकारात वापरून नये.


या पुस्तकांच्या विक्रीमधून मिळणाऱ्या उत्पन्नाचा १०% भाग वंचित विद्यार्थ्यांच्या वाचनासाठी आणि आयुष्यभराच्या अध्ययन कार्यक्रमांना सहाय्य करण्यासाठी देण्यात येतो.




"आय लव्ह रीडिंग लायब्ररी ही पुस्तकांची एक वैशिष्ट्यपूर्ण मालिका आहे. या लायब्ररीच्या माध्यमातून नव्या आणि वाचनाबद्दल एक प्रकारचा न्यूनगंड असलेल्या वाचकांना सातत्यपूर्ण वाचनासाठी प्रोत्साहित करण्यात येते. वेगेवगळ्या पातळ्यांवर असलेल्या मुलांच्या अध्ययन गरजांनुसार उत्तम दर्जाचा आणि सुंदर डिझाइन असलेला कंटेन्ट उपलब्ध करून देण्यात येत आहे. या माध्यमातून भारत आणि जगातील उत्तम साहित्यकृती सादर करण्यात येत आहेत. आमच्या पुस्तकांमध्ये गीता धर्मराजन यांचे स्टोरीपेडॅगॉगीTM (कथाअध्ययनशास्त्र) समाविष्ट करण्यात आले आहे, जे विशेषतः पहिल्या पिढीतील वाचकांमध्ये वाचनाच्या आनंदाचा प्रसार करते, आणि मुलांना मोठ्या कल्पना आणि जादुई जगात घेऊन जाते!
(विचार करा, विचारा, चर्चा करा, कृती करा आणि साध्य करा)."

कथाज होलिस्टिक अर्ली लर्निंग (खेल) प्रयोगशाळेच्या माध्यमातून सरकारी, स्वयंसेवी संस्थांमधील आणि खासगी शाळांमधील शिक्षकांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात येतात. या F2F (फेस टू फेस) कार्यशाळा असतात आणि त्यांना ऑनलाइन सत्रांची जोड दिलेली असते. या कार्यशाळेत शिक्षकांना, शाळा प्रशासकांना आणि स्वयंसेवकांना रीडिंग टीचर्स प्रमाणपत्र प्राप्त होते. अधिक माहितीसाठी 300m@katha.org या ईमेलवर संपर्क साधावा.

मनोरंजनात्मक आणि अर्थपूर्ण वाचन करा







































FOR OUR BOOKS

www.books.katha.org

“गोष्टींच्या माध्यमातून बहुविध भारताची ओळख.”
- द पायोनिअर

मुलांसाठी
'कथा'चे पुस्तक
ISBN 978-93-88284-81-3
9 789388 284813
www.katha.org
XXX

इंडिगो सीरिजमध्ये